# लहानपणची दिवाळी








दिवाळी म्हणजे दीपोत्सव. उत्साह आणि आनंद घेऊन येणारा सण म्हणजे दिवाळी. भारतीयांचा हा सर्वात मोठा सण आहे. प्रत्येक लहान थोर व्यक्ती दिवाळीची वाट पहात असते. अश्विन महिना सुरू झाला की लागलीच दिवाळीची तयारी म्हणजे घर सफाई, रंगरंगोटी आणि दिवाळीची जोरदार खरेदी.

दिवाळी आली की मला लहानपणची खूप आठवण येते. त्यावेळी घर पाहुण्यांनी भरलेले असायचे. ती लहानपणची दिवाळी चांगली ५/६ दिवसांची म्हणजे वसुबारस, धनत्रयोदशी, नर्कचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा आणि भाऊबीज. वसुबारसाच्या दिवशी गाय, बैल आणि वासरू ह्यांची पूजा करून, नैवेद्य दाखवून त्यांना चारा खायला द्यायचो. ज्या जनावरांनी आपल्याला वर्षभर दूध, जळणासाठी गवऱ्या व शेतीसाठी मदत केली त्यांची आठवण ठेवायचो.

धनत्रयोदशीला नवीन आलेल्या धान्याची पूजा करायची

आणि बायका बाजारात जाऊन नवीन भांडी खरेदी करायच्या. त्यादिवसापासूनच मातीच्या पणत्या लावून दीपोत्सव सुरु व्हायचा. आजकाल आकाशदिवे विकत मिळतात पण आमच्या लहानपणी प्रत्येकजण घरी वेगवेगळे आकाशदिवे करायचो आणि उत्तम आकाशदिव्याला मोठी माणसे बक्षीस द्यायचे तसंच घराघरातून मुलं मातीचे किल्ले करायची आणि एकमेकांचा किल्ला पहाण्याचा सगळ्यांना खूप उत्साह होता, अशी ती मजा काही औरच होती. अजूनही महाराष्ट्रात दिवाळीत मुलं किल्ले करतात.

घराघरातून बायका दिवाळीच्या फराळाचे करण्यात दंग असायच्या. प्रत्येक घरी लाडू, चिवडा, चकली, करंज्या, अनारसे तयार होत असायचे व फराळाचा वास सगळीकडे दरवळायचा. ताटभरून फराळाच्या पदार्थांची देवाणघेवाण व्हायची. नर्कचतुर्दशीला भल्यापहाटेच उटणं लावून सूर्योदयाच्या आधीच स्नान आटपायचे व मग सगळ्यांनी एकत्र बसून दिवाळीच्या फराळावर ताव मारायचा. कुरकुरीत चकली आणि घरचं लोणी, ह्याची चव अजूनही जिभेवर आहे.

दिवाळीच्या दिवसात सकाळ संध्याकाळ घरासमोर सडा टाकून सुंदर सुंदर रांगोळ्या काढायची गल्लीगल्लीतून चढाओढ असायची. सगळी गल्ली रांगोळ्यांनी सजलेली असायची जणूकाही रस्त्यावर रंगीत गालिच्याच पसरलेला वाटायचा.

फटाके आणायचा पण एक मोठा कार्यक्रमच असायचा. फटाक्यांची दुकान गावाबाहेरच असायची. वडीलधाऱ्या मंडळींबरोबर जाऊन दहा रुपयांत टोपलीभरुन फटाके घेऊन यायचो, पण अगदी जपून वापरायचो कारण तुळशीच्या लग्नासाठी ते ठेवायचो.

अशा एक ना अनेक आठवणी दिवाळीशी जोडलेल्या आहेत. दिवाळी आली की परत लहान व्हावेसे वाटते. सायन्स एवढे पुढे गेले आहे की मला दिवाळीच्या वेळेस परत लहान करून माझ्या लहानपणच्या दिवाळीची मजा परत अनुभवता येईल का?

सौ. मीना गरुड
पुणे